# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २३/१०/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

**विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस स्टेशन कन्हान तसेच पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे रूटमार्च घेण्यात आला रूटमार्च दरम्याम पोलीस अधिकाऱ्यांनी नागरिकांसोबत साधला संवाद**

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** अंतर्गत आज दिनांक २३/ १०/२०२४ रोजीचे १६/०० ते १७/०० वा पर्यंत विधानसभा निवडणूक संबंधाने मा.श्री दीपक अग्रवाल (भा.पो.से.)उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपस्थितीत पोलीस स्टेशन चौक बुटीबोरी ते शिवाजी चौक,मुख्य मार्केट दुर्गा मंदीर, लुंबिनी विहार, आर.एस.जी टाऊन मैदान पर्यंत तसेच मौजा सातगाव मुक्ताई हॉस्पिटल ते जिल्हा परिषद शाळा ते गौरकर किराणा ते ज्ञानदीप शाळा चौक पर्यंत रूट मार्च घेण्यात आला. असता रूट मार्चमध्ये पोलीस स्टेशन बुटीबोरी येथील ०३ अधिकारी,१४ अंमलदार तसेच सशस्त्र सीमा बल चे पथक हजर होते. रूट मार्च दरम्यान आर. एस. जी. टाऊन मैदान बुटीबोरी व सातगाव ज्ञानदीप शाळा चौक येथील नागरिकांना सशस्त्र सीमा बल चे अधिकारी व कर्मचारी यांनी आगामी विधानसभा निवडणूक संबंधाने कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता मतदान करण्याबाबत आव्हान करण्यात आले.

**पोस्टे कन्हान अंतर्गत** आज दिनांक २३/१०/२०२४ रोजी १८:३५ ते १९:१० वाजे पर्यंत मा श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी ,उपविभाग कन्हान यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपस्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते नाका नंबर ७,गांधी चौक ते पोलीस स्टेशन कन्हान असा रूटमार्च घेण्यात आला. असुन रूटमार्च दरम्यान **पोलीस अधिकारी यांनी नागरिकांसोबत संवाद साधुन त्यांना निवडणुक संबधाने मार्गदर्शन करण्यात आले तसेच तसेच भयमुक्त तसेच शांततेत निवडणुक पार पाडण्याबाबत चर्चा करण्यात आली**. सदर रूटमार्च पोलीस स्टेशन कन्हान चे ५ अधिकारी ,१६ अंमलदार तसेच सशस्त्र सिमा बलातील ३ अधिकारी व ३० अंमलदार हजर होते.




RSG TOWN


फैमस क्लॉथ



## पोस्टे कळमेश्वर हद्दीतील पारधी बेडा गोंडखैरी
## येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

दि. २२/१०/२०२४ रोजीपो.स्टे. कळमेश्वर हद्दीत पारधी बेडा गोंडखैरी येथे अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु गाळणारे एकुण ०७ महिला **आरोपी** हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातून १) ७०२० लिटर मोहाफूल गावठी दारू कि.७०२०००/—रू. २) ३९०० लिटर मोहाफूल सडवा रसायन कि.१३६५००/—रू. ३) मोहाफूल गावठी दारू गाळण्याचे इतर साहित्य कि.१९८००/—रू ४) १५०० लिटर मोहाफूल रसायन भरलेले किंमती ५२५००/—रू.असा एकुण कि.९१०८००/—रू चा मुदेमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. महिला आरोपींविरुद्ध पो.स्टे कळमेश्वर येथे कलम ६५ (सी), (ई), (ब)महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ,मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनातपोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोनि मनोज काळबांडे, सपोनि सविता वड्डे व इतर स्टाफ यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर